


राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना विनम्र अभिवादन

# दैनिक आपला विदर्भ



स्वामी विवेकानंद यांना विनम्र अभिवादन

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 151 ■ रविवार, दि. 12 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे रविवारी, दि. १२ जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून सिंदखेड राजा येथे आयोजित राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार, सकाळी ६ वाजता मॉं जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त सुर्योदयी महापुजेस उपस्थिती, सकाळी ९ वाजता जिजामाता विद्यालय येथील भव्य आरोग्य शिबीर उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती, सकाळी ११ वाजता चिखली तालुक्यातील सवना येथे आयोजित आरोग्य शिबिरास उपस्थिती, दुपारी १२ वाजता बुलढाणा येथील सहकार विद्या मंदीर येथे एफएसएसआयद्वारा आयोजित प्रशिक्षण शिबिरास उपस्थिती, त्यानंतर सिंदखेड राजाकडे प्रस्थान करतील.

## धक्कादायक! आप आमदाराचा डोक्यात गोळी लागून मृत्यू

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना आप पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पंजाबमधील आमदार गरप्रीत बस्सी गोगी यांच्या डोक्यात गोळी लागल्यामुळे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे कुटुंबियांनवर दु:खाचे डोंगर कोसळले असून सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. पंजाबमधील लुधियाना पश्चिम मतदारसंघाचे आपचे आमदार गुरप्रीत बस्सी गोगी बंदूक साफ करताना त्यांच्या डोक्यात गोळी लागल्याने मृत्यू झाला. परंतु यावेळी बायको-मुलं घरात असताना एका खोलीत जात गोगी यांनी स्वत:वर गोळी झाडून घेतल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, या घटनेनंतर आमदार गोगी यांना डीएमसी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच आप आमदाराच्या मृत्यूचे कारण शोधण्यासाठी मृतदेहाचे पोस्टमार्टम केले जात आहे.

नेमके घडले काय?

गुरप्रीत गोगी शुक्रवारी एका सामाजिक कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यानंतर संध्याकाळी उशिरा घरी पोहोचले. त्यानंतर जेवण करून आपल्या खोलीत गेले. त्यानंतर थोड्यावेळात खोलीतून गोळीबार झाल्याचा आवाज आला. आवाज ऐकताच त्यांच्या पत्नी डॉ. सुखचैन बस्सी खोलीकडे धावल्या. खोलीत गोगी रक्ताच्या धारोळ्यात पडलेले दिसले, हे पहिल्यानंतर पत्नीच्या पायाखालची वाळूच सरकली. तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं, पण डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## बेस्ट बसचा पुन्हा अपघात; विक्रोळीत दोघांना चिरडले!

**मुंबई/प्रतिनिधी :** कुर्ल्यातील बेस्ट बसच्या अपघाताची बातमी ताजी असतानाच विक्रोळीत बेस्ट बसने दोन जणांना चिरडल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. बेस्ट बस चालक गाडी चालू ठेवून लघुशंकेला गेल्यानंतर गाडी अनियंत्रित होऊन दोन पादचाऱ्यांना जागीच ठार केले.विक्रोळी कन्नमवार नगर परिसरात शनिवारी सकाळी बेस्ट बस चालकाच्या हलगर्जीपणामुळे मोठा अपघात झाला. गाडी चालू ठेवून बस चालक लघुशंकेला गेला असता गाडीचे नियंत्रण सुटून गाडीने चहाच्या टपरीला धडक देऊन नंतर पादचाऱ्यांना चिरडले. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. जखमी असलेले दोन्ही इसम हे वेठबिगारीची काम करत असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान विक्रोळी पोलिसांनी बस चालकाला ताब्यात घेतले आहे.

## प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या प्रसिद्ध अभिनेत्याला हृदयविकाराचा झटका; प्रकृती गंभीर, तातडीने रुग्णालयात दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते टीकू तलसानिया यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती समोर आली आहे. त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अभिनेते टीकू तलसानिया यांनी त्यांच्या कॉमेडीने प्रेक्षकांना खळखळून हसवले आहे. त्यांनी अनेक हिट चित्रपटांमध्ये आमिर खान, अजय देवगण यांसारख्या कलाकारांसोबत कामही केले आहे. अभिनेते टीकू तलसानिया यांनी हिंदी आण गुजराती चित्रपटांमध्ये काम केले आहे.

# सर्वात मोठी बातमी! सातही आरोपींवर मोक्का

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी : बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात एसआयटीनं मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींवर मोक्का लावण्यात आला आहे. आज कोर्टातील सुनावणीदरम्यान याबाबतची माहिती एसआयटीकडून दिली जाऊ शकते.**







खरं तर, संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या केल्यानंतर सर्व आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत होती. आतापर्यंत पोलिसांनी एकूण आठ जणांना या प्रकरणात अटक केली आहे. पण त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली नव्हती. आता अखेर देशमुख हत्या प्रकरणात एसआयटीनं मोठी कारवाई केली आहे. सर्व आरोपींवर मोक्का लावण्यात आल्याची माहिती एसआयटी पथकातील वरिष्ठ सूत्रांकडून देण्यात आली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात विविध नावं समोर येत असल्याने ही संघटीत गुन्हेगारी असल्याचं पोलिसांकडून कोर्टात सांगितलं जात होतं. टोळीच्या माध्यमातून बीडमध्ये गुन्हे केले जातायत, असं कोर्टात सांगितलं जात होतं. आता मोक्का कलम लावण्यात आला आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात एसआयटीनं सर्व आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई केली असली तरी ही कारवाई वाल्मिक कराडवर होणार नाही. कारण अद्याप वाल्मिक कराड याचं नाव संतोष देशमुख हत्या प्रकरणात समोर आलं नाही. पोलिसांनी वाल्मिकला दोन कोटींच्या खंडणी प्रकरणात अटक केली आहे. देशमुख हत्या प्रकरणात त्याचं कनेक्शन बाहेर आल्यास वाल्मिकवर देखील ही कारवाई होऊ शकते. पण तूर्तास एसआयटीने वाल्मिक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई केली नसल्याची माहिती समोर आली आहे.

### एक महिन्यातील घटनाक्रम

६ डिसेंबर
- संतोष देशमुखांचा मस्साजोग पवनचक्कीवर वाद

९ डिसेंबर
- सरपंच संतोष देशमुखांची हत्या
- धनंजय देशमुखांनी केली केजमध्ये तक्रार
- केज पोलिसात ६ जणांविरोधात गुन्हा

१० डिसेंबर
- बीडमध्ये सामान्यांचा रास्तारोको
- जयराम चाटे आणि महेश केदारला अटक

११ डिसेंबर
- क्राईम ब्रांचकडून प्रतिक घुलेला अटक
- वाल्मिक कराडवर खंडणीचा गुन्हा

१३ डिसेंबर
- बीड जिल्हा बंदची हाक
- देशमुख हत्याप्रकरणाचा तपास सीआयडीकडे

१४ डिसेंबर
- केज पोलीस निरीक्षक महाजन सक्तीच्या रजेवर
- विष्णू चाटेची राष्ट्रवादीतून हकालपट्टी

१८ डिसेंबर
- विष्णू चाटेला अटक

१९ डिसेंबर
- देशमुखांच्या शवविच्छेदनात मारहाण झाल्याचं स्पष्ट

२१ डिसेंबर
- पोलीस अधीक्षक अविनाश बारगळांची बदली
- नवनीत कॉवत नवे पोलीस अधीक्षक
- शरद पवार,अजित दादांनी घेतली देशमुख कुटुंबियांची भेट

२४ डिसेंबर
- खंडणी प्रकरणाचा तपास सीआयडीकडे

२८ डिसेंबर
- जिल्हाधिकारी कार्यालयावर सर्वपक्षीय मोर्चा

३१ डिसेंबर
- वाल्मिक कराड सीआयडीला शरण

३ जानेवारी
- डॉ. संभाजी वायबसे, सिद्धार्थ सोनावणेला घेतलं ताब्यात

४ जानेवारी
- सुधीर सांगळे, सुदर्शन घुलेला पुण्यातून अटक

६ जानेवारी
- शरद पवारांचं मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र
- धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी सर्वपक्षीयांची राज्यपालांची भेट

७ जानेवारी
- देशमुख कुटुंबियांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट
- आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार

# शेतकऱ्यांना मिळणार मोठा दिलासा, कर्जाची मर्यादा ३ लाख रुपयावरुन ५ लाख रुपये होणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :२०२५ च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी बातमी मिळण्याची शक्यता आहे. १ फेब्रुवारीच्या आगामी अर्थसंकल्पात सरकार किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाख रुपयांवरुन ५ लाख रुपये करण्याची तयारी करत आहे. ख्रण मर्यादे संदर्भात सरकारला सतत मागण्या प्राप्त होत होत्या. त्यामुळं या मागणीच्या संदर्भातने सरकार ख्रण ची मर्यादा ५ लाख रुपये करण्याची शक्यता आहे.

किसान क्रेडिट कार्ड योजना २६ वर्षांपूर्वी १९९८ मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेंतर्गत शेती व संबंधित कामे करणाऱ्या शेतकऱ्यांना ९ टक्के व्याजाने अल्पमुदतीचे कर्ज दिले जाते. या योजनेची विशेष बाब म्हणजे सरकार कर्जावरील व्याजावर २ टक्के सूटही देते. त्याचवेळी, जे शेतकरी संपूर्ण कर्जाची वेळेवर परतफेड करतात, त्यांना प्रोत्साहन म्हणून आणखी ३ टक्के सवलत दिली जाते. म्हणजेच हे कर्ज शेतकऱ्यांना केवळ ४ टक्के वार्षिक व्याजावर दिले जाते. ३० जून २०२३ पर्यंत असे कर्ज घेणाऱ्यांची संख्या ७.४ कोटींहून अधिक होती. ज्यावर ८.९ लाख कोटींहून अधिकची थकबाकी दिसली.कर्ज मर्यादा वाढवल्यास कृषी क्षेत्रातील उत्पादनात वाढ होणार




शेतीच्या खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. उलट दीर्घकाळापासून शेतकऱ्यांना दिलेल्या कर्ज मर्यादेत कोणतीही वाढ झालेली नाही. बजेटमध्ये ख्रण मर्यादा वाढवल्यास कृषी क्षेत्रातील उत्पादनात वाढ होईल आणि कृषी उत्पन्नातही वाढ दिसून येईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनशैलीत बदल होण्याबरोबरच त्यांना कर्जाची वेळेवर परतफेडही करता येणार आहे.

किसान क्रेडिट कार्डचा उद्देश लहान शेतकऱ्यांना दिलासा देणे हा आहे. लहान शेतकऱ्यांना अनुदानित कर्जाचीही नितांत गरज आहे. जेणेकरून त्यांचे उत्पन्नही वाढेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी नाबार्ड वित्तीय सेवा विभागाच्या सहकार्याने मोहीमही राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. जेणेकरून पशुपालन आणि मत्स्यपालन करणाऱ्या लोकांनाही कर्ज मिळू शकेल.

किती क्रेडिट कार्ड जारी केले?

नाबार्डच्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२४ पर्यंत सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांनी १६७.५३ लाख किसान क्रेडिट कार्ड जारी केले आहेत. ज्यांची एकूण क्रेडिट मर्यादा १.७३ लाख कोटी रुपये होती. दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना ११.२४ लाख कार्ड जारी करण्यात आले, ज्यांची मर्यादा १०,४५३.७१ कोटी रुपये होती. त्यापैकी ६५,००० किसान क्रेडिट कार्ड मच्छिमारांना देण्यात आले, ज्यांची मर्यादा ३४१.७० कोटी रुपये होती.

## वॉन्टेड खलिस्तानवाद्याला चंद्रपुरातून अटक

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** अमृतसर येथील पोलीस चौकीवर हँड ग्रेनेड फेकणारा वॉन्टेड खलिस्तानवाद्याला चंद्रपूर येथून शिताफीनं पकडण्यात गुप्तचर यंत्रणेला यश आलंय. स्थानिक पोलीस आणि गुप्तचर यंत्रणेनं ही संयुक्त कारवाई केली. जसप्रीत सिंग (वय २०) असं या खलिस्तानवाद्याचं नाव आहे. शुक्रवारी (१० जानेवारी) सकाळच्या सुमारास अत्यंत गुप्तपणे ही कारवाई करण्यात आली. यानंतर आरोपीला पंजाब पोलिसांच्या हवाली करण्यात आलं.

२०२३ मध्ये अमृतसर येथील पोलीस चौकीवर हल्ला करण्याचा मास्टरमाईंड जसप्रीत सिंग असल्याची माहिती आहे. यात त्यानं पोलीस ठाण्यावर हँड ग्रेनेड फेकलं होतं. बाईक चोरी करुन त्या आतंकवादी कारवाईत वापर करण्यातही तो माहीर होता. अमली पदार्थांच्या धंद्यातही त्याचा सक्रिय सहभाग होता. यानंतर तो फरार झाला, तेव्हापासून पंजाब पोलीस त्याच्या मागावर होते. यापूर्वी तो मेघालय राज्यात गेल्याची माहिती होती. त्याच्या मोबाईल फोनवरुन गुप्तचर यंत्रणा त्याचा ठावठिकाणा घेत होती. अशातच सहा दिवसांपूर्वी तो महाराष्ट्रात दाखल झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याबाबत केंद्रीय गुप्तचर यंत्रणेनं अलर्ट जारी केला. या दरम्यान जसप्रीत सिंग हा चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस इथं आला. इथल्या लॉयड मेटल या कंपनीनं काम सुरू केलं आहे. या परिसरात जसप्रीत अन्य ओळखीच्या व्यक्तीसोबत राहत होता. इथूनच गुप्तचर यंत्रणेच्या पथकानं त्याला उचललं, अशी माहिती गुप्तचर यंत्रणेच्या सूत्रांनी दिली. जसप्रीत हा क्रेन चालक होता. लॉयड मेटल कंपनीनं ज्या कंपनीनं दुसऱ्या कंपनीला ट्रान्सपोर्टचं कंत्राट दिलं आहे. त्याच कंपनीत तो पूर्वी कामाला होता. याच कंपनीतील सहकाऱ्यांच्या ओळखीनं जसप्रीत हा घुग्गुसला आला. जसप्रीत सिंगचे फोटो आधीच जारी करण्यात आले. याच नावानं तो घुग्गुस इथं राहत होता. गुप्तचर यंत्रणा त्याच्यावर निगराणी ठेवून होते, मात्र हा तोच आरोपी आहे का याची शहानिशा होत नव्हती. गुरुवारी जसप्रीत हा इथल्या स्थानिक सुपर मार्केटमध्ये खरेदी करण्यासाठी आला. याच दिवशी हा तोच आतंकवादी असल्याची पुष्टी झाली आणि यानंतर त्याला अटक करण्यात आली.

# केस गळतीनंतर आता ब्ल्यू बेबी सिंड्रोमच सावट

दैनिक आपला विदर्भ

### बुलढाण्यातली ९ तालुक्यातील १३५ ठिकाणचे भूगर्भातील पाणी पिण्यास अयोग्य

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील ११ गावांमध्ये केस गळतीचा प्रकार समोर आल्यानंतर जिल्ह्यात सर्वच तालुक्यात दूषित पाण्यामुळे संपूर्ण जिल्हा ब्ल्यू बेबी सिंड्रोमच्या छायेत आला असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. प्रामुख्याने जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील चित्र गंभीर आहे. जिल्ह्यातील घाटाखालील काही तालुके हे खारपान पट्ट्यात येतात. केंद्रीय भूजल मंडळाच्या वार्षिक भूजल गुणवत्ता अहवालात जिल्ह्यातील भूजलात विषारी पदार्थ असल्याची घोषणा करण्यात आली होती. याकडे आरोग्य विभाग व लोकप्रतिनिधींचे सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे घाटाखालील किडनीग्रस्त रुग्णांची संख्या ही अधिक झाली आहे. आता यासह इतरही आजार हळूहळू डोके वर काढत असल्याचे माहिती आहे.

दरम्यान, चार दिवसांपूर्वीच घाटाखालील शेगाव तालुक्यातील अनेक गावात तीन दिवसात टक्कल अशी घटना समोर आल्याने राज्यभरात खळबळ उडाली आहे. या विषयाची तपासणी केल्यानंतर एक गंभीर समस्या समोर आली आहे आणि तो म्हणजे या गावातील पाण्यात नायट्रेटचं प्रमाण पाचपटीने म्हणजे ५४ मिलिग्राम इतकं वाढलं आहे. त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांचे टक्कल पडत असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. याच दरम्यान भूजल सर्वेक्षण विभागाने जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या पाण्याची जैविक व रासायनिक तपासणी केली असता यात नायट्रेटसह इतर विषारी घटकांचा समावेश असल्याची माहिती समोर आल्याने जिल्ह्यात सर्वच तालुके ''ब्लू बेबी सिंड्रोम ''च्या छायेत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हा आजार झाल्यास बालकाच्या शरीरातील अवयव कार्यक्षमता कमी होते व यात नवजात बालकांचा समावेश होतो.

या आजाराला इन्फंट मेथेमोग्लोबीनेमिया असे वैद्यकीय भाषेत म्हटले जात. यामुळे बाळाची त्वचा निरसळ होण्यास सुरुवात होते. बाळाच्या रक्तातील हिमोग्लोबिन कमी होतं आणि हिमोग्लोबिन हे शरीरात ऑक्सिजन वाहून नेण्यासाठी आणि विविध पेशींच्या विकासासाठी आवश्यक असतं . मेंदूला रक्तपुरवठा अथवा ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्यास त्याचा परिणाम बाळाच्या वाढीवर होतो.



जिल्ह्यातील शेगाव, नांदुरा, जळगाव जामोद, खामगाव ,देऊळगाव राजा, सिंदखेड राजा, मलकापूर व मोताळा या नऊ तालुक्यातील अनेक गावातील पाण्याचे नमुने सर्वेक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आले. या तालुक्यातील १३५ पाण्याचे नमुने हे दूषित आढळून आले असून यात नायट्रेट व टीडीएस प्रमाण जास्त आढळले आहे.

जिल्ह्यातील अनेक तालुक्यात दूषित व पिण्यास आणि वापरण्यास अयोग्य पाणी आहे त्यामुळे आम्ही जनतेला आवाहनही केलं आहे जिल्ह्यातील अनेक भागाचे सॅम्पल आम्ही वरिष्ठ लॅबोरेटरी नाशिक व अहमदाबाद येथे पाठवले आहे मात्र मानवाच्या शरीरात नायट्रेटचे प्रमाण आढळत नसल्याने सध्या तरी आम्ही अहवालाची प्रतीक्षा करत आहोत मात्र शरीरात नायट्रेटचं प्रमाण आढळल्यास ब्लू बेबी सिंड्रोम होतो हे नक्की.

## आजची युवा पिढी व सद्यस्थिती

जगातील सर्वात तरुण जन देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्र्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतः चा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते. गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात.संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या देशातील ६९ टक्के तरुणांना ठाम विश्र्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.

# ठरलं..! व्हॉईस ऑफ मीडियाची जिल्हा बैठक दणक्यात!

## जिल्हाध्यक्षपदी कृष्णा सपकाळ यांची एकमताने निवड; सुनील मतकर आणि गुलाबराव इंगळे कार्याध्यक्ष

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पत्रकार आणि पत्रकारितेसाठी काम करणाऱ्या व्हाईस ऑफ संघटनेची जिल्हा बैठक आणि नवीन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा आज,१० जानेवारीला बुलडाणा येथील पत्रकार भवन परिसरात पार पडला. यावेळी जिल्हाध्यक्ष म्हणून बुलडाणा लाइव्हचे युवा पत्रकार कृष्णा सपकाळ यांची एकमताने निवड करण्यात आली. कार्याध्यक्ष म्हणून पुण्यनगरीचे देऊळगाव राजा प्रतिनिधी सुनील मतकर व जळगाव जामोदचे जेष्ठ पत्रकार गुलाबराव इंगळे यांच्या नावांची घोषणा करण्यात आली.

या बैठकीच्या आधी जिल्हाभरातील पत्रकारांचा १० लाख रुपयांचा अपघात विमा काढण्यात आला. यावेळी बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार धर्मवीर संजय गायकवाड, व्हाईस ऑफ मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, डाकघर अधीक्षक गणेश अंभोरे, राज्य कोर कमिटी सदस्य अरुण जैन, विभागीय कार्याध्यक्ष अजय बिल्लारी, विदर्भ संघटक सिद्धार्थ खरात, राज्य कार्यवाहक लक्ष्मीकांत बगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पत्रकारांचे आरोग्य, शिक्षण, घर यासह पत्रकारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व्हाईस ऑफ मीडिया काम करत आहे. गेल्या तीन वर्षात संघटना आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचली असून जगातील ४९ देशांमध्ये व्हाईस ऑफ मीडियाचे सदस्य आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्वाधिक पत्रकारांनी व्हॉईस ऑफ मीडियाची सदस्य नोंदणी केलेली आहे. सध्या व्हाईस ऑफ मीडियाचा संघटनात्मक बांधणी पंधरवाडा सुरू असून राज्यात ठिकठिकाणी संघटनात्मक निवडणूक सुरू आहेत.

याच कार्यक्रमाचा भाग म्हणून व्हॉईस ऑफ मीडियाच्या जिल्हाध्यक्षांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. आज, १० जानेवारीला पत्रकार भवनात पार पडलेल्या जिल्हा बैठकीत राज्य कोअर कमिटी सदस्य अरुण जैन यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून कृष्णा सपकाळ यांच्या नावाची सूचना केली त्याला उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने दुजोरा दिला. त्यानंतर नवनियुक्त जिल्हाध्यक्ष कृष्णा सपकाळ यांनी २०२५ ते २०२७ या कालावधीसाठी नवीन जिल्हा कार्यकारिणीची घोषणा केली.असे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संदीप वंत्रोले यांनी कळविले आहे.

### अशी आहे जिल्हा कार्यकारिणी...

१) जिल्हाध्यक्ष : कृष्णा सपकाळ, बुलढाणा, बुलढाणा लाईव्ह
२) कार्याध्यक्ष : सुनील मतकर, देऊळगाव मही, पुण्य नगरी
३) कार्याध्यक्ष : गुलाबराव इंगळे, जळगाव जामोद, सकाळ
४) उपाध्यक्ष : नीलेश जोशी, बुलढाणा, लोकमत
५) उपाध्यक्ष : मुशीरखान कोटकर, देऊळगाव राजा, सकाळ
६) उपाध्यक्ष : किशोरअप्पा भोसले (एकच घाव, खामगाव)
७) उपाध्यक्ष : समाधान गाडेकर, चिखली, देशोन्नती
८) सरचिटणीस : रफिक कुरेशी, मेहकर, सकाळ
९) सहसरचिटणीस : सुनील तिजारे, बुलढाणा, दै. भास्कर
१०) कोषाध्यक्ष : संदीप शुक्ला, बुलढाणा, लोकशाही चॅनल
११) सहकोषाध्यक्ष : दिनेश मुडे, बुलढाणा, दिव्य मराठी
१२) कार्यवाहक : सुखनंदन इंगळे, बुलढाणा, दिव्य मराठी
१३) कार्यवाहक : ब्रम्हानंद जाधव, बुलढाणा, महाभुमी
१४) संघटक : साबीर अली, बुलढाणा, उर्दू टाईम्स्
१५) संघटक : काशीनाथ मानकर, संग्रामपूर, देशोन्नती
१६) संघटक : पप्पू (गणेश राठी), मोताळा, लोकमत
१७) संघटक : श्याम सोनुने, लोणार, अधिकारनामा
१८) प्रवक्ता : फहीम देशमुख, शेगाव, एमएनसी/पुण्य नगरी
१९) प्रसिद्धीप्रमुख : संदीप वंत्रोले, बुलढाणा, नवराष्ट्र
२०) सदस्य : गणेश उबरहंडे, बुलढाणा, हसरी दुनिया
२१) सदस्य : अमोल खेकाळे, चिखली, काळ-काम-वेग
२२) ज्येष्ठ मार्गदर्शक तथा निमंत्रीत सदस्य : संजय मोहिते, बुलढाणा, लोकसत्ता
२३) ज्येष्ठ मार्गदर्शक तथा निमंत्रीत सदस्य : अनिल (नाना) पळसकर, चिखली, विदर्भ दर्पण
२४) ज्येष्ठ मार्गदर्शक तथा निमंत्रित सदस्य पुरुषोत्तमजी सांगळे, ब्रेकिंग महाराष्ट्र-

## टॉप अभिनेत्रीचा प्रसिद्ध उद्योगपतीवर लैंगिक शोषणाचा आरोप, ज्वेलरी बिझनेसमन अटकेत

**मुंबई/प्रतिनिधी :** फिल्म इंडस्ट्रीमध्ये अनेक कास्टिंग काऊच, अभिनेत्रींचे लैंगिक शोषण आणि गैरवर्तनाच्या घटना समोर येतात. अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते यांच्याव्यतिरिक्त इंडस्ट्रीशी संबंधित इतरही काही व्यक्तींनी अभिनेत्रीचे किंवा तरुणींचे लैंगिक शोषण केल्याच्या बातम्या अनेक वेळा आल्या आहेत. आता एका टॉप अभिनेत्रीने एका व्यावसायिकावर लैंगिक शोषणाचा आरोप केला आहे. अभिनेत्रीने या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल केली असून पोलिसांनी आरोपी व्यावसायिकालाही अटक केली आहे. अभिनेत्रीने एका ज्वेलरी ब्रँडचा मालक असलेल्या उद्योपपतीवर लैंगिक शोषण केल्याचा आरोप केला आहे. अभिनेत्री हनी रोझ हिने व्यावसायिकाविरोधात तक्रा केली आहे. अभिनेत्री हनी रोझ मल्याळम चित्रपट उद्योगातील टॉप अभिनेत्रींपैकी एक आहे.

## इंग्रजांनी लावलेलं दीडशे वर्ष जुनं 'निवडुंग' आजही वेधतो लक्ष; 'निवडुंग उद्यान प्रकल्प' पुन्हा सुरु करण्याची पर्यावरणप्रेमींची मागणी

**अमरावती/प्रतिनिधी :** उष्ण भागात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या निवडुंगाचं झाडं सुमारे दीडशे ते दोनशे वर्षांपूर्वी विदर्भातील थंड हवेचं ठिकाण असणाऱ्या चिखलदरा येथे इंग्रजांनी लावलं. ते लागलं आणि वाढलं देखील. विशेष म्हणजे चिखलदरा येथील ओसाड पडलेल्या निवडुंग उद्यानात दीडशे वर्ष जुनं 'निवडुंग' एखादी कलाकृतीच भासावी असा भासतो. २०१७ मध्ये वनविभागाच्या वतीनं चिखलदऱ्यात 'निवडुंग उद्यान' विकसित करण्यात आले. मात्र, २०२० मध्ये सारं उद्यान उध्वस्त झालं. खरंतर विविध प्रकारच्या निवडुंगांनी चिखलदरा आणखी सुंदर होऊ शकतो. विदर्भातील हे थंड हवेचं ठिकाण निवडुंगांनी सजावं, अशी अपेक्षा पर्यावरण आणि निसर्गप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

चिखलदरा येथे इंग्रजांनी विशिष्ट परिसरात निवडुंग विकसित केले. विशेष म्हणजे इंग्रजांनी निवडुंग विकसित करण्यासाठी हा परिसर शंभर वर्षासाठी लीजवर घेतला होता. त्यावेळी अमेरिकेतून निवडुंगाच्या काही प्रजाती चिखलदरा येथे आणून त्या लावण्यात आल्या. यापैकीच निवडुंगाच्या दोन पैकी एक निवडुंग हे निवडुंग परिक्षेत्र परिसरात आणि दुसरं वनविभागाच्या उद्यान परिसरात होतं. या दोन्ही निवडुंगाची उंची २५ ते ३० फूट गेली. शंभर वर्षानंतर वनविभागानं इंग्रजांना या उद्यानासाठी लिज वाढवून देण्यास नकार दिला. ''या परिसरात इंग्रजांनी दीडशे वर्षांपूर्वी लावलेलं एक निवडुंग आकर्षणाचं केंद्रबिंदू असलं तरी निवडुंग विकासाबाबत योग्य विचार झाला असता, तर हा परिसर विविध प्रजातींच्या निवडुंगांनी आता सजला असता, असं पर्यावरण प्रेमी आणि 'ऑर्गनायजेशन फॉर कुला' या सामाजिक संस्थेचे प्रमुख राकेश महल्ले म्हणाले.ज्याप्रमाणं इंग्रजांनी चिखलदरा येथे निवडुंग उद्यान विकसित केलं. त्याप्रमाणं २०१५ मध्ये चिखलदरा येथे नव्यानं निवडुंग उद्यान विकसित करण्यासंदर्भात अमरावती जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी प्रस्ताव मांडला होता. त्यानंतर २०१७ मध्ये अतिशय छानसं निवडुंग उद्यान चिखलदरा येथे विकसित करण्यात आलं.

## स्वबळावर लढावंच लागेल, संजय राऊतांच्या भूमिकेला अरविंद सावंतांचा पाठिंबा; ठाकरेंच्या सेनेचं एकला चलो धोरण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी नागपूरमध्ये बोलताना स्वबळाचा नारा दिला. यावर राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया येत आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेचे दक्षिण मुंबईचे खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभा आणि विधानसभेला स्वबळाची आवश्यकता होती. आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना महापालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायतीमध्ये संधी द्यायची असते. कार्यकर्त्यांना संधी द्यायची असेल आणि त्रांगड होत असेल तर अडचणी निर्माण होत असतील तर स्वावलंबी व्हावं. स्वबळावर लढावं, संजय राऊत यांची भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे, असं अरविंद सावंत म्हणाले.



आमच्याकडे काही शिवसैनिक म्हणतात एकटे लढलो असतो तर २० पेक्षा अधिक आलो असतो असं म्हणतात. उद्धव ठाकरे एकटे होते, युती तुटली होती, कोणी बरोबर नव्हते. आठवले, जानकर सोडून गेले होते, विधानसभा निवडणुकीत एकटं लढल्यानंतर ६३ आमदार निवडून आले होते. तो अनुभव गाठिशी आहे. निश्चितपणे लोकांमध्ये उद्धव ठाकरेंबद्दल लोकांमध्ये सद्भाव आहे. एकटं लढलं की अनेक प्रश्नांची उत्तरं मिळतात, असं अरविंद सावंत म्हणाले.

शिवसेनेची ताकद अगोदरपासून होती.शिवसेना महापालिकेवर १९८५ पासून राज्य करतेय. भाजपसोबत देखील अनेकदा युती झाली नव्हती. मराठी माणसाचं अस्तित्व,अस्मिता, महाराष्ट्राचा धर्म आज बुडित आहे. सारंच विकलं गेलं आहे. सारंच विकलं गेलं आहे. भ्रष्टाचार टोकाचा आहे. मराठी माणसाच्या अस्तित्वाला, अस्मितेला धक्का लावण्याचा प्रयत्न सत्ताधारी आणि विरोधकांकडून होत असतो त्याला आव्हान देण्याची गरज आहे. ती महापालिकेच्या निवडणुकीत मराठी माणसांचा धर्म दाखवणं आवश्यक आहे, असं अरविंद सावंत म्हणाले.

संजय राऊतांचा स्वबळाचा नारा

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असं संजय राऊत यांनी स्पष्टपणे जाहीर केले. इतर पक्षांनी पण कार्यकर्त्यांसाठी स्वबळावर निवडणूक लढवावी असा सल्लाही त्यांनी दिला.

नागपूर पासून मुंबई पर्यंत आम्ही स्वबळावर लढणार आहोत.एकदा आम्हाला पाहायचं आहेच, जे काही होईल ते होईल. आमचं असं ठरतंय की मुंबई,ठाणे नागपूर मध्ये कार्यकर्त्यांना संधी केव्हा देणार याचा विचार करावा लागेल. कार्यकर्त्यांना संधी न दिल्यामुळे पक्ष वाढीला फटका बसतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्व पक्षांनी स्वबळावर लढवाव्या आणि आपापल्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी, असं संजय राऊत म्हणाले. राजकारणात कुणीही कुणाचा कायमचा शत्रू मित्र नसतो. राजकारणात काही असंभव नसतं, असं संजय राऊत म्हणाले.

## सलमान खानसारखाचं 'बिन लग्नाचा' आहे हा साऊथ सुपरस्टार, डेटिंगच्या अफवा पसरुनही आहे अविवाहित

**मुंबई/प्रतिनिधी :** सलमान खान हा बॉलिवूड चित्रपटसृष्टीतील एक असा अभिनेता आहे जो वयाच्या साठीच्या उंबरठ्यावर पोहोचूनही अविवाहित आहे. आजवर त्याच्या प्रेमप्रकरणांबद्दल अनेक बातम्या आल्या असल्या तरी, तो कोणत्याही मुलीशी लग्न करू शकला नाही. दक्षिण चित्रपटसृष्टीतही असाच एक सुपरस्टार आहे, जो ४५ वर्षांचा आहे पण अजूनही अविवाहित आहे. सध्या या साऊथ सुपरस्टारच्या लग्नाच्या बातम्या जोर धरत आहेत. अनेक सुपरहिट चित्रपट देणाऱ्या या साऊथ सुपरस्टारचे चाहते आता प्रभास कोणत्या सुंदरीशी लग्न करणार आहे याबद्दल अंदाज लावत आहेत.

दक्षिणेतील सिनेसृष्टीतील कलाकार योग्य वयात लग्न करतात आणि स्थायिक होतात. यामध्ये, अल्लू अर्जुन, राम चरण आणि ज्युनियर एनटीआर, हे सर्व प्रभासपेक्षा लहान आहेत आणि वडीलही झाले आहेत. प्रभास ४५ वर्षांचा झाला आहे, पण तो अजूनही अविवाहित आहे. असं असं तरी त्याच्या अफेअरबद्दल अनेक अफवा पसरल्या होत्या. पण तो कोणत्याही मुलीशी लग्न करू शकला नाही. त्याचा एक जुना व्हिडिओ देखील आहे, यामध्ये त्यानं स्वत: कबूल केलं आहे की अनेक मुलींनी त्याचा प्रस्ताव नाकारला आहे.

प्रभास त्याच्या लव्ह लाईफमध्ये खूप स्पष्ट आहे. त्याचं नाव अनेक अभिनेत्रींशी जोडलं गेलंय. परंतु त्यानं नेहमीच त्या अफवांचं खंडन केलं आहे. या अफवांमध्ये अनुष्का शेट्टी आणि कृती सेनॉन यांच्याबरोबरच्या डेटिंगच्या अफवांचाही समावेश आहे. अलीकडे त्यानं असंही म्हटलंय की लवकरच लग्न करण्याचा त्याचा कोणताही विचार नाही. प्रभासचं नाव बाहुबलीतील त्याची सह-कलाकार असलेल्या अनुष्का शेट्टीबरोबर अनेकवेळा जोडलं गेलं आहे.

# विदर्भातील सर्वात मोठी वीजचोरी उघड

## राईस मिलकडून महावितरणचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** :नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथून चोरीची एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. रामटेक तालुक्यातील देवलापार येथील ताज राईस मिल या औद्योगिक ग्राहकाकडील तब्बल १ कोटी २ लाख २३ हजार ८९४ रुपयांची वीज चोरी महावितरणच्या भरारी पथकाने उघडकीस आणली आहे. या कारवाईत तडजोडीच्या रकमेपोटी १३ लाख १० हजाराच दंड देखील ठोठविला आहे. संपुर्ण विदर्भात एवढ्या मोठ्या रकमेची वीज चोरी पहिल्यांदाच उघडकीस आली आहे. याप्रकरणी ताज राईस मिलचे शफ़िक अंसारी यांच्या विरोधात रामटेक पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३, सुधारीत २००७ च्या कलम १५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र या चोरीच्या घटनेने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

तब्बल १ कोटी २ लाख २३ हजार ८९४ चे महावितरणचे आर्थिक नुकसान

महावितरणचे पथक देवलापार येथील ताज राईस मिलचा विजपुरवठा व संच तपासणी करण्याकरिता गेले असता तेथे विज वापराची नोंद होण्यासाठी असलेल्या थ्री फेजच्या औद्योगिक विज मीटरला महावितरणचे सील नव्हते, सोबतच अतिरिक्त केबल जोडून वीज पुरवठा सुरू होता. या सर्व प्रकाराची योग्य शहानिशा करून ग्राहकाने अवैधरीत्या विज पुरवठा घेत मागील १२ महिन्याच्या कालावधीत ४ लाख ९० हजार ३२ विज युनिटचा अवैध वापर करून तब्बल १ कोटी २ लाख २३ हजार ८९४ चे महावितरणचे आर्थिक नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास सध्या सुरु आहे.

मॅंग्निज चोरीच्या वाहनासह दोघांना अटक

चिखला माईन्सच्या प्रतिबंधित क्षेत्रातून मॅंग्नेजची चोरी करून त्याची वाहतूक करणाऱ्या दोघांना पोलिसांनी नाकाबंदी करून अटक केली आहे. या कारवाईत विनानंबरची काळ्या रंगाची महिंद्रा गाडी आणि २० प्लास्टिकच्या पिशव्यांमधील काळा मॅंग्नीज असा सुमारे ४ लाख रुपयांचा हा मुद्देमाल गोबरवाही पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई भंडारा जिल्ह्यातील हिरापूर हमेशा गावाजवळ पोलिसांनी केली. आकाश नागपुरे (२४) रा. नाकाडोंगरी आणि जाफर शेख (३४) रा. चिखला या दोघांवर गुन्हे दाखल करून त्यांना गोबरवाही पोलिसांनी अटक केली.




दरम्यान, अकोला जिल्ह्यातील चोहोट्टा बाजार येथील एका बारमध्ये मोबाईल चोरीची घटना घडलीय. मोबाईल चोरीचा हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेरा कैद झालाय. दारू पिण्यासाठी आलेल्या एका ग्राहकाने हा मोबाईल लंपास केलाय. वाईन बारच्या काउंटरवरून या चोरट्याने हा महागडा आयफोन कंपनीचा सव्वा लाखांचा मोबाईल लंपास केलाय. चौकडीचा शर्ट घातलेल्या व्यक्तीने काउंटरवरील मॅनेजरला बोलण्यात गुंतवत सव्वा लाखांचा आयफोन लंपास केलाय. याबाबत बारमालकाने पोलीसात तक्रार दिलीये. पोलीस आता या चोरट्याचा शोध घेत आहेय.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### परफ्यूमवरील तारखा बदलताना बाटल्यांचा स्फोट; एकाच कुटुंबातील ४ जण गंभीर जखमी

दैनिक आपला विदर्भ

**नालासोपारा/प्रतिनिधी :** नालासोपाऱ्यात बॉडी स्प्रे च्या बाटल्यांचा भीषण स्फोट झाल्यानं एकच खळबळ उडाली आहे. या स्फोटात एकाच कुटुंबातील चार जण होरपळून गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर स्थानिक खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यातील एकाची प्रकृती गंभीर असल्याचं सांगितलं जात आहे.

नेमकं काय घडलं? : नालासोपारा पूर्वच्या संकेश्वरनगरमधील रोशनी अपार्टमेंटच्या रूम नंबर ११२ येथे सुगंधी द्रव्याच्या (बॉडी स्प्रे) बॉटल भरण्याचे काम सुरू होते. त्यावेळी अचानक स्फोट झाला, अशी माहिती आचोळे पोलिसांनी दिलीय. या घटनेची माहिती मिळताच आचोळे पोलिसांसह अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस आणि स्थानिकांच्या मदतीनं जखमींना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं. जखमींमध्ये महावीर वडर (वय ४१) त्यांच्या पत्नी सुनिता वडर, मुलगी हर्षदा आणि ९ वर्षीय मुलगा हर्षवर्धन वडर यांचा समावेश आहे. यातील मुलगा हर्षवर्धन याची प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगितलं जातंय.

स्फोटाचं कारण काय? : नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, परफ्यूम बॉटलवरील तारखा संपल्या होत्या. त्या भंगारात देण्यासाठी त्या खाली करण्याचं काम सुरू होतं. याच दरम्यान परफ्यूममधील ज्वालाग्रही पदार्थाचा घरात स्वयंपाक बनवत असताना आगीशी संपर्क झाला आणि भीषण स्फोट झाला. दरम्यान, या घटनेनंतर शेजारील नागरिक भयभीत झाले असून परिसरातील नागरिकांमध्येही भीतीचं वातावरण आहे. तर या घटनेचा अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिलीय.

### ठाकरे गटाचा स्वबळाचा नारा! कोकाटेंनी सगळंच काढलं; म्हणाले, त्यांनी उघडं लढावं की कपडे...

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत आत्मविश्वास बळावलेल्या महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत मोठा फटका बसला. यानंतर महाविकास आघाडीतील धुसफूस समोर येत आहे. नुकताच शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याचा नारा दिलाय. यामुळे महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडल्याचे दिसून येत आहे. आता यावरून राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी संजय राऊत यांना जोरदार टोला लगावलाय.

संजय राऊत यांनी आज नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महानगरपालिका निवडणुकीबाबत मोठी घोषणा केली. ते म्हणाले की, मुंबईसह नागपूरपर्यंत आम्ही महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढवणार आहोत. मग काय होईल ते होईल? एकदा आम्हाला आमची ताकद आजमावायचीच आहे. आम्ही महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढणार आहोत. नागपूरला सुद्धा आम्ही स्वबळावर लढणार आहोत. आम्हाला उद्धव ठाकरे यांनी याबाबत संकेत दिले आहेत. कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार? कारण आघाडीत आणि विधानसभेत कार्यकर्त्यांना निवडणूक लढण्याची संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाला आणि पक्षाच्या वाढीला बसतो. महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि नगरपंचायतीमध्ये निवडणुका स्वबळावर लढून आपापले पक्ष मजबूत करावे लागतात, अशी घोषणा त्यांनी केली.

नेमकं काय म्हणाले माणिकराव कोकाटे?

संजय राऊत यांच्या घोषणेनंतर राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया येत आहेत. आता राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी संजय राऊत यांना जोरदार टोला लगावलाय. त्यांनी म्हटलंय की, तो त्यांचा प्रश्न आहे. त्यांनी काय करावे? कुणासोबत लढावे? कुणासोबत लढावे? उघडे लढावे की कपडे घालून लढावे,तो त्यांचा प्रश्न आहे. त्यांना जे योग्य वाटते आहे त्यांनी ते करावे, असे माणिकराव कोकाटे म्हणाले.

चर्चा करुन निर्णय घ्यायला हवा : जितेंद्र आव्हाड

संजय राऊत यांच्या घोषणेनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत वक्तव्य केले आहे. ठाकरे गटाचा निर्णय झाला असेल तर थांबवणारे आम्ही कोण? राऊतांनी चर्चा करुन निर्णय घ्यायला हवा होता, अशी प्रतिक्रिया त्यांनी संजय राऊत यांच्या स्वबळाच्या नाऱ्यावर दिली आहे.

### अपत्यहिन महिलांना गरोदर करा अन् ५ लाख मिळवा; बिहारमध्ये अनोखा स्कॅम; पोलिसांनी केला रॅकेटचा पर्दाफाश!

पटणा : बिहार पोलिसांनी एका अनोख्या घोटाळ्याचा पर्दाफाश केला आहे. यामध्ये अपत्यहीन महिलांना गरोदर करण्याच्या बदल्यात ५ लाख रुपये पुरुषांना देण्याचे आमिष दाखवण्यात आले आहे. शुक्रवारी पोलिसांनी या टोळीचा पर्दाफाश केला. नवादा जिल्ह्यातून प्रिन्स राज, भोला कुमार आण राहुल कुमार यांना अटक करण्यात आली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. ऑल इंडिया प्रेग्नेंट जॉब (बेबी बर्थ सर्व्हिस) आणि प्लेबॉय सर्व्हिस यांसराख्या कार्यक्रमांच्या नावाखाली फसवणूक करणारे, लोकांना फोन करून आमिष दाखवून पैसे उकळत होते. या टोळीने भारतातील अनेक राज्यांमध्ये अनेकांची फसवणूक केली आहे. आतापर्यंत फसवणूक झालेल्यांची संख्या जाणून घेण्याचा प्रयत्न पोलीस करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फसवणूक करणारे वेगवेगळ्या राज्यातील लोकांना फोन करून किंवा व्हॉटस्अॅप करून संवाद साधत होते. ज्या स्त्रियांना मूल होत नाही, त्यांना यशस्वीरित्या गर्भधारणा करण्याचं करण्याचं आमिष दाखवलं जातं. प्रक्रिया अयशस्वी झाल्यास अतिरिक्त ५० हजार रुपये देण्याचे खोटं आश्वासनही देण्यात आलं होतं.

# मंत्रीपदाचा राग मिरजकर जनतेवर काढू नका- इद्रिस नायकवडी

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** आमदार सुरेश खाडे यांची मिरजेतील ही आमदारकीची शेवटची टर्म असून दिवा विझताना फडफडत असतो. मंत्रीपदाचा राग खाडे यांनी मिरजकरांच्यावर काढू नये. मिनी पाकिस्तान या वक्तव्याबाबत जोपर्यंत आमदार सुरेश खाडे माफी मागत नाहीत तोपर्यंत कोणत्याही प्रकारची त्यांच्याशी संबंध राहणार नाहीत असा इशारा, आमदार इद्रिस नायकवडी यांनी दिला आहे. मिरज येथे आमदार इद्रिस नायकवडी



हे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यापुढे आशी वादग्रस्त वक्तव्य झाली तर त्याचे परिणाम भोगावे लागतील असा इशाराही आमदार इद्रिस नायकवडी यांनी यावेळी दिला.

दंगलीमुळे अगंतुकपणे, सुरेश खाडे यांना आमदारकी मिळाली होती. कोणतेही मेरिट नसताना आणि मिरजेशी काही संबंध नसताना आणि मिरजेच्या संस्कृतीशी काही संबंध नसताना खाडे यांना पंधरा वर्षे आमदारकी मिळाली, अशी टीका करून आमदार इद्रिस नायकवडी पुढे म्हणाले, आमदार सुरेश खाडे यापूर्वीही सुद्धा व्यावसायिक होते आणि आता सुद्धा व्यावसायिक आहेत. हिंदू मुस्लिम ऐक्याचा शहर आणि चळवळीचे ठिकाण असताना या ठिकाणी असले वादग्रस्त वर्तन यापुढे खपवून घेतले जाणार नाही, असा इशाराही आमदार इद्रिस नायकवडी यांनी दिला आहे.

कोणतेही कर्तुत्व नसताना सवंग लोकप्रतियेसाठी वादग्रस्त वक्तव्य करण्याची मंत्री नितेश राणे यांची सवय आहे, मिरजेतील कत्तलखान्याविषयी वक्तव्य करताना जबाबदार पदावर असणाऱ्या मंत्री नितेश राणे यांनी माहिती करून बोलणं गरजेचं होतं, असा टोलाही आमदार इद्रिस नायकवडी नायकवडी यांनी लगावला आहे.

## संजय राऊतांचं संतुलन बिघडलंय, ते स्वतंत्र लढू किंवा एकमेकांच्या डोक्यावर राहून लढू, आम्हाला चिंता नाही, विखे पाटलांचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेला या तिन्ही पक्षाला जनतेने नाकारलं आहे. ते आता निवडणुका स्वतंत्र लढू किंवा एकमेकांच्या डोक्यावर राहून लढू त्याची आम्हाला चिंता नसल्याचे वक्तव्य राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं. राज्यामध्ये जो विजय आम्हाला विधानसभेला मिळाला तोच विजय आम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मिळेल, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला. आगामी महापालिका निवडणुका शिवसेना ठाकरे गट स्वबळावर लढवणार असल्याचं खासदार संजय राऊत यांनी सांगितलं आहे. यावर विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. ते शिर्डीत बोलत होते.

शिर्डीत भाजपचे राज्यस्तरीय अधिवेशन होणार आहे. अधिवेशन स्थळाचा आज राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सुद्धा भाजपला महाविजय मिळवायचा आहे. या निवडणुकांच्या दृष्टीने रणशिंग फुंकल जाणार असल्याचे विखे म्हणाले.

भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून तिन्ही पक्षांनी सत्ता स्थापन केली होती

मी मागेच म्हणालो होतो महाविकास आघाडीची बिघाडी व्हायला वेळ लागणार नाही. महाविकास आघाडीचे लोक भूमिका आणि तत्व यासाठी एकत्र आलेले नाहीत. महाविकास आघाडीची सत्तेत येण्याची धडपड होती असा टोला विखे पाटलांनी लगावला. कोणी हिंदुत्व सोडलं, कोणी आपल्या विचारधारेला बाजूला ठेवल्याचे विखे पाटील म्हणाले. सत्ता गेल्याबरोबर महाविकास आघाडीतील मतभेद समोर यायला सुरुवात झाल्याचे ते म्हणाले. काँग्रेस उबाठाबद्दल बोलतंय उबाठा राष्ट्रवादी बद्दल चर्चा करतय, असे म्हणत विखे पाटलांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून तिन्ही पक्षांनी सत्तेच्या लालसापाई सत्ता स्थापन केली होती. निगेटिव्ह नेरेटिव्ह सेट करून त्यांनी विजय संपादन केला होता. मात्र, ते नेरेटिव्ह विधानसभेला चाललं नाही असंही विखे पाटील म्हणाले. मुख्यमंत्री पदाची स्वप्न पाहणारे घरी बसलेत, काँग्रेस पक्षाची दुरावस्था मी सांगण्याचं कारण नाही असेह विखे म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत महाविकास आघाडी राहील अशी स्थिती नाही असंही ते म्हणाले.

संजय राऊत यांचं संतुलन बिघडलंय

संजय राऊत यांना फक्त मुद्दा पाहिजे



असतो. त्यांनी स्वत:चं अस्तित्व गमावलं आहे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी माध्यमंना चुकीची माहिती दिली त्यांच्यावर कारवाई केली जाईल असंही विखे पाटील म्हणाले. संजय राऊत यांचं माझ्यावर विशेष प्रेम आहे. राऊत यांचं संतुलन बिघडल्याचे विखे म्हणाले. आगामी निवडणुका भाजप स्वबळावर लढवणार का? याबाबत देखील विचारण्यात आलं. यावेळी विखे पाटील म्हणाले, तो अधिकार माझा नाही. महायुतीमध्ये सोबत असणारे सगळ्या घटक पक्षाचे प्रमुख नेते आणि भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेते याबाबत निर्णय करतील असे विखे पाटील म्हणाले.

### 'हाथी चले बजार पालतू कुते भौंके हजार...' हरभजन सिंगच्या टार्गेटवर नक्की कोण? सोशल मीडियावर खळबळ

नवी दिल्ली : माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंग आता नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतो. दरम्यान, तो एका पोस्टमुळे चर्चेत आला आहे. खरंतर, या पोस्टमध्ये तो खूप रागावलेला दिसत आहे. त्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‶ वर एक पोस्ट टाकून सर्वांना आश्चर्यचकित केले. भज्जीने त्याच्या पोस्टमध्ये हिंदीमध्ये एक म्हण लिहिली आहे.

हरभजन सिंगने‶ वर लिहिले की, ''हाथी चले बजार पालतू (इग्ग्) कुते भौंके हजार.'' पण, भज्जीने ही पोस्ट का आणि कोणाबद्दल केली हे स्पष्ट झाले नाही. चाहत्यांनी कमेंट्सद्वारे भज्जीच्या या पोस्टमागील कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला, पण काहीही स्पष्ट झाले नाही. पण, हे लक्षात घेण्यासारखे आहे की भज्जीची ही पोस्ट बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये टीम इंडियाला १-३ असा पराभव पत्करावा लागला त्यानंतर आली आहे.

वर्षाच्या सुरुवातीला हरभजन सिंग संघाच्या सुपरस्टार कल्चरबद्दल बोलला होता. खरंतर, बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. यासह, भारताने १० वर्षांनी ही ट्रॉफी गमावली. या पराभवानंतर टीम इंडियावर जोरदार टीका होत आहे. संघाचे कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या पराभवानंतर हरभजनने त्याच्या यूट्यूब चॅनलवर सुपरस्टार संस्कृतीवर प्रश्न उपस्थित केले होते. तो म्हणाला होता, ''एक सुपरस्टार कल्चर निर्माण झाली आहे. जे संपले पाहिजे. आपल्याला सुपरस्टार्सची गरज नाही, तर कामगिरी करू शकणाऱ्या खेळाडूंची गरज आहे. जर तसे झाले तर संघ पुढे जाईल.''

याआधी सिडनी कसोटी सामन्यात रोहितने स्वत:ला प्लेइंग-११ मधून बाहेर ठेवल्यानंतर एका युजरने प्रश्न उपस्थित करत म्हटले की, कोणता नेता आपला संघ असा सोडून पळून जातो का? यावर हरभजनने लिहिले की, ''मला माहित आहे कोण पळून गेले. मी तुम्हाला आठवण करून देऊ का? आणि तुम्हाला कारण देखील सांगतो. तुमच्या अंगावर काटा येईल.'' या पोस्टनंतर हरभजन सिंगला सोशल मीडियावर खुप ट्रोल करण्यात आले होते.

## सावकारगिरी करणाऱ्या अवैध महिलांवर सहकार विभागाची धाड

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती शहरालगत दोन महिला स्वतंत्ररित्या अवैध सावकारी करत असल्याची तक्रार सहकार विभागाकडे प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे सहकार विभागाच्या दोन पथकांनी एकाचवेळी धाड टाकून या दोन्ही महिलांच्या ताब्यातील स्टॅम्प पेपर व अन्य दस्तावेज जप्त केले. या प्रकरणात सहकार विभागाने चौकशी सुरू केली आहे. अवैध महिला सावकारावर जिल्ह्यात अलीकडे झालेली ही पहिलीच कारवाई आहे.

काही दिवसांपूर्वीच मोर्शी सहायक निबंधक कार्यालयात एका तक्रारदाराने मोर्शीत दोन महिला अवैध सावकारी करत असल्याची तक्रार दिली. त्या तक्रारीच्या आधारे सहकार विभागले दोन पथके तयार केली. या दोन्ही महिला मोर्शी येथे अप्पर वर्धा विभागाच्या – वापरात नसलेल्या शासकीय वसाहतीतून अवैध सावकारी करत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने एकाच वेळी दोन्ही महिलांकडे धाड टाकली. त्यावेळी दोन्ही – ठिकाणांहून पथकाला अवैध सावकारी – संबंधित स्टॅम्पपेपर व इतर



म ह त्त्व ा च`

दस्तावेज मिळून आले. सहकार विभागाच्या पथकाने ते जप्त केले आहेत. ही कारवाई जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या मार्गदर्शनात पथक प्रमुख स्वाती गुडघे, पथक प्रमुख प्रीती धामणे, सुधीर मानकर, प्रदीप देशमुख, अविनाश महल्ले यांच्यासह सहकार विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली.

मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी लेखी व्यवहारापेक्षा तोंडी व्यवहारच अधिक केले आहे. महिला अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात कारवाईसाठी नेमलेल्या पथक तक्रारदाराने महिला अवैध सावकारी करत असल्याचे सांगितल्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी कारवाईसाठी महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र पथक तयार केले. महिला अधिकाऱ्यांनीच पुढाकार घेऊन ही कारवाई यशस्वी केली. या वेळी पुरुष अधिकारी, कर्मचारी त्यांच्या मदतीसाठी होते मात्र नेतृत्व महिला अधिकाऱ्यांनीच केले. ही कारवाई जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या मार्गदर्शनात पथक प्रमुख स्वाती गुडघे, पथक प्रमुख प्रीती धामणे, सुधीर मानकर, प्रदीप देशमुख, अविनाश महल्ले यांच्यासह सहकार विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली.

### श्रद्धा हत्याकांड २.० : लिव इन पार्टनरची हत्या, १० महिने फ्रीजमध्ये ठेवला मृतदेह; लाईट गेल्यानंतर...

उज्जैन : दिल्लीतील श्रद्धा वालकर हत्याकांडासारखाच एक धक्कादायक प्रकार मध्य प्रदेशातील दमोह येथे उघडकीस आला आहे. जिथे एका तरुणाने १० महिन्यांपूर्वी त्याच्या लिव्ह-इन प्रेयसीची हत्या करून तिचा मृतदेह फ्रीजमध्ये ठेवला होता. शहरातील वीज गेल्यानंतर खोलीतून दुर्गंधी येत असताना ही हत्या उघडकीस आली. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी प्रियकराला अटक केली आहे. तसेच, या प्रकरणात पोलिसांनी मोठा खुलासा केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेची हत्या करणारा तरुण तिच्यासोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होता. प्रेयसी त्याच्यावर लग्नासाठी दबाव आणत होती. यामुळे आरोपी संयाजने नाराज होऊन असे पाऊल उचलले. आरोपी संजयने १० महिन्यांपूर्वी त्याच्या लिव्ह-इन पार्टनरची हत्या केली होती आणि तिचा मृतदेह फ्रिजमध्ये ठेवून पळून गेला होता. पोलिसांनी आरोपी संजय पाटीदारला उज्जैन येथून अटक केली आहे.

हत्येचे रहस्य झाले उघड

आरोपी संजय पाटीदार त्याच्या लिव्ह-इन पार्टनरसोबत भाड्याच्या खोलीत राहत होता. त्याने १० महिन्यांपूर्वी प्रेयसीचा गळा दाबून खून केला. वीज खंडित झाल्यानंतर घरात राहणाऱ्या इतर भाडेकरूंना दुर्गंधी येत असताना हा खून उघडकीस आला. पोलिसांना याची माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना फ्रिजमध्ये मृतदेह पाहून धक्काच बसला. शरीर पूर्णपणे काळे झाले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉक्टरांचे एक पॅनेल महिलेचे शवविच्छेदन करेल. त्याच वेळी, घरमालकाने सांगितले की, संजय खोलीला कुलूप लावून निघून गेला आहे. तो भाडेही देत नव्हता. सतत काही ना काही सबबी सांगत होता.

## भिवंडीत भोंदू बाबाने महिलेला घातला पाऊणे नऊ लाखांचा गंडा

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला तरीसुद्धा आजही भोंदू बाबांकडून भोळ्या भाबड्या नागरिकांची फसवणूक करण्याचे गुन्हे समोर येत आहे. पतीच्या आजारपण तसेच मुलावरील काळी जादू उतरवण्यासाठी मृतदेहाची पूजा करायची आहे असे सांगून महिले कडून ८ लाख ८७ हजार उकळण्याचा प्रकार समोर आला आहे. नुसरा अख्तर अलीम अन्सारी, ४६ वर्षे,रा.मिल्लतनगर असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव असून हजरत बाबा उर्फ अमजद असद खान असे गुन्हा दाखल झालेल्या भोंदू बाबाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार महिला यांचे पती अख्तर हे आजारी असल्याने त्यांनी उपचार करून ही सुधारणा होत नसल्याने त्या दरम्यान महिलेच्या दुकानात ऑक्टोंबर २०२३ मध्ये ग्राहक म्हणून आलेल्या हजरत बाबा यांच्याशी ओळख झाली. त्याने चिंताग्रस्त पती सोबत बोलताना तुमच्यावर काळी जादू झाली असल्याचे सांगितले. तर मुलावर कोणीतरी काळी जादू केली असून, मुला वरील काळी जादू न उतरवल्यास सहा महिन्यात तो जीव गमावून बसेल अशी भीती दाखवत ही काळी जादू संपवण्यासाठी कब्रस्तानातील मृतदेह आणावा लागेल .त्यातून पती व मुला वरील त्रास संपेल तसेच तुमची आर्थिक परिस्थिती सुधारून दुकान सुध्दा चांगले चालेल असे सांगितले.पिडीत महिलेचा विश्र्वास संपादन करण्यासाठी त्यांच्या समोर घरात केलेल्या पुजे दरम्यान अंड्या मधून खिळा काढून दाखवला.



# केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केस गळती बाधीत गावांना दिल्या भेटी

## संशोधनासाठी शास्त्रज्ञ आणि तज्ञ डॉक्टरांची टीम येणार असल्याची दिली माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केस गळती हा आजार कशामुळे झालाय हे शोधण्यासाठी दिल्ली चेन्नई येथून विशेष तज्ञ डॉक्टरांची टिम बोलवण्यात आली आहे आयुर्वेद युनानी होमिओपॅथी ऍलोपॅथीचे तज्ञ डॉक्टर्स आणि आय सी एम आर चे शास्त्रज्ञ या विचित्र केस गळती आजारावरचे संशोधन करीत आहे नागरीकांनी घाबरून नये असे आवाहन केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले





बुलडाणा जिल्ह्यतील शेगाव तालुक्यातील अकरा गावामध्ये नागरीकांचे केस गळती होऊन टक्कल पडत असल्याची समस्या निर्माण झाली आहे आज ११ जानेवारी रोजी केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केस गळती बाधीत गावांना भेटी दिल्या रुग्णांसोबत संवाद सांघला आणि आजाराविषयी जाणून घेतले . हा आजार पहिल्यांदाच उद्भवला असल्याने आजाराच्या मुळाशी जावुन संशोधन करणे गरजे आहे दृष्टिकोनातून केंद्र आणि सरकारच्या आरोग्य विभागातर्फे उपाय योजना सुरु आहे.

घरघुती वापरातील तेल साबण शाम्पू या उत्पादनांची तपासणी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे नागरिकांनीही या उत्पादनांची मुदत बाह्य झाली आहे का याचीही तपासणी करून ते वापरण्याचे आवाहन त्यांनी केले केस गळती होत असलेल्याच्या घटनांची वेळीच दखल घेऊन मी तुम्हाला भेटण्यासाठी आणि धीर देण्यासाठी आलो आहे असुन केंद्र आणि राज्य सरकारचे आरोग्य विभाग २४ तास तुमच्या सेवेत राहणार आहेत असेही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी ग्रामस्थांना सांगितले यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ भागवत भुसारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गीते उपस्थित होते

## विविध वृत्त...

### शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार; २६ जानेवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारे राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटुंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी दि. २६ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षिंकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरीता उत्कृष्ठ क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (माहिला क्रीडा मार्गदर्शक), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शासन निर्णय दि.२९ डिसेंबर २०२३ व दि. २५ जानेवारी २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली-२०२३ विहीत केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांनी विहीत मुदतीत क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in संकेतस्थळावर अर्ज करावा. ही लिंक दि.१४ जानेवारी ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीपर्यंत सुरु राहिल. तसेच अर्ज स्वीकारण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे कार्यालय कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवशी देखील सुरु ठेवण्यात येत आहे.

### पी. एम.श्री जि. प. उर्दू प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा ढाणकी येथे आनंद मेळावा उत्सव साजरा



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा या उद्देशाने दरवर्षी आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाते.त्याच प्रमाणे यावर्षी सुद्धा शनिवारला पी. एम.श्री जि. प. उर्दू प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा ढाणकी येथे आनंद मेळावा साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले. या मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देवाणघेवाण व्यवहार तसेच स्वतः केलेल्या कामाचा आनंद प्रत्यक्ष व सहज घेता आला. काही अनुभव हे पुस्तकांपेक्षा प्रात्यक्षिकातून उत्कृष्ट रितीने येतात , हा अनुभव आनंद मेळाव्यात पालकांना व विद्यार्थ्यांनी आला.

सदर कार्यक्रमात गावातील पालकवर्ग, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती, प्रमुख पाहुणे शे.जब्बार,युवा ग्रामीण पत्रकार संघ ढाणकी, यांची उपस्थिती लाभली. तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शे.जमीर शे.मौला यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,शे जमीर,उपाध्यक्ष अस्मा नाहिद सै.जावेद,मोसीन भाई व सर्व सदस्य तसेच मुख्याध्यापक शे.मुद्दशीर मुर्तूजा शे , सहाय्यक शिक्षक सै.अलीम सै.निजाम , मोसीन सर , नजीर सर,साबेर सर व माधव गोरे यांनी अथक परिश्रम घेतले.

### कोकण हार्टेड गर्लच्या आयुष्यात नव्या पाहुणीचं आगमन; होणाऱ्या नवऱ्यासोबत केलं स्वागत

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर कोकण हार्टेड गर्ल आणि 'बिग बॉस मराठी सीझन ५'मुळे घराघरात पोहोचलेली अंकिता वालावलकर नेहमीच चर्चेत असते. 'बिग बॉस मराठी'पासून अंकीता घराघरात पोहोचली. सध्या कोकण हार्टेड गर्ल चर्चेत आहे ती तिच्या लगीनघाईमुळे. सध्या अंकीताची लग्नाची तयारी जोरात सुरू आहे. पुढच्या महिन्यात अंकिता प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक कुणाल भगतसोबत आपली लग्नगाठ बांधणार आहे. अशातच अंकीताच्या आयुष्यात आणखी एका नव्या पाहुणीचं आगमन झालं आहे.

गेल्या काही दिवसांपासून अंकिता आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरुन 'ती येतेय', 'ती आलीय... वाट बघतेय', अशा पोस्ट शेअर करत होती. यामुळे चाहत्यांच्या मनात एक कोडं निर्माण झालं होतं. अशातच आता तिनं चाहत्यांना एक गोड सरप्राईज दिलं आहे. अंकिताच्या आयुष्यात आलेली नवी पाहुणी दुसरी, तिसरी कुणी नसून एक आलिशान, नवीकोरी ऑडी कार आहे. चाहत्यांसोबत आपल्या नव्या कारची झलक शेअर करताना 'कोकण हार्टेड गर्ल'नं 'आवडी आली', असं कॅची कॅप्शन दिलं आहे.

अंकितानं शेअर केलेल्या फोटोंमध्ये तिची आलिशान कार ऑडी आणि त्यासोबत अंकिता आणि कुणाल दोघेही दिसत आहेत. अंकिलानं नुकतीच आपली आधीची कार विकली होती. त्यानंतर तिनं चाहत्यांसोबत व्हिडीओ शेअर करुन दुसरी नवी गाडी घेण्याचा विचार होता, म्हणूनच मी जुनी गाडी विकली असं सांगितलं होतं. तसेच, सध्या मी दोन-तीन गाड्यांमध्ये कन्फ्युज आहे, त्यामुळे अंकिला नवी गाडी घेणार असल्याचं चाहत्यांना आधीपासूनच माहिती होती. अखेर तिनं सरप्राईज देत, आपल्या आलिशान ऑडीची झलक चाहत्यांसोबत शेअर केली आहे.

# ढाणकी येथे राष्ट्रमाता फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** भारतीय स्त्री क्रांती मध्ये मोलाची भूमिका निभविनाऱ्या आणि पहिल्या मुस्लीम शिक्षिका ,समाजसुधारक राष्ट्रमाता फातिमा शेख यांची १९२ वी ढाणकी येथे जयंती साजरी करण्यात आली.



राष्ट्रमाता फातिमा शेख या आधुनिक भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिकांपैकी एक असून त्यांनी फुले यांच्या शाळेत शोषित वंचित असणाऱ्या बहुजन समाजातील मुला मुलींना शिक्षण देण्याचे महान कार्य त्यांनी केले. अमेरिकन मिशनरी सिंथिया फरारकडून चालवल्या जाणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर त्यांची भेट सावित्रीबाई फुलेंशी झाली.फुलेंनी स्थापन केलेल्या पाचही शाळांमध्ये त्यांनी शिकवले. तसेच त्यांनी सर्व धर्म आणि जातीच्या मुलांना शिकवले. १८५१ मध्ये मुंबईत दोन शाळांच्या स्थापनेत शेख यांनी भाग घेतला. तसेच फातिमा शेख यांनी समाजसुधारक ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यासोबत १८४८ मध्ये स्वदेशी पुस्तकालय सुरू केले, जे देशातील पहिले मुलींचे शाळा मानले जाते.२०२२ ला गूगल ने डूडल बनवून त्यांना सम्मानित करून जागतिक स्तरावर त्यांच्या कार्याची नोंद घेतली होती.

अशा या महान समाजसुधारक फातिमा शेख भारतीय शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारक यांची १९२ वी जयंती ढाणकी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक स्थळी साजरी करण्यात आली. राष्ट्रमाता फातिमा शेख यांचा क्रांतिकारी विचार आत्मसात करून आपल्या जीवनात अंमलबजावणी करून वर्तमान हक्क अधिकारांसाठी संघर्ष केला पाहिजे. माता फातिमा शेख यांनी माता सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांच्या महान कार्यात तहयात साथ देत स्त्री शिक्षण क्रांतीसाठी मोलाची कामगिरी बजावून महान कार्य केले असे प्रतिपादन या कार्यक्रमाची अध्यक्षता करताना भारतीय युवा मोर्चाचे विद्वान केवटे यांनी केले.

या कार्यक्रमात सत्कारमूर्ती म्हणून ग्रामीण युवा पत्रकार संघाचे शहराध्यक्ष शेख इरफान भाई यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून रामराव गायकवाड,पत्रकार शेख इरफान,शिवसेनेचे एजाज पटेल,आयोजक शेख जब्बार यांनी फातीमा शेख यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे संचालन भारतीय युवा मोर्चाचे अमोल पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रिय मुस्लीम मोर्चा चे महासचिव मुनव्वर भाई यांनी केले. या कार्यक्रमाला अशोक गायकवाड, विकी मुदराज, मिलिंद चिकाटे,मतीन भाई,अक्षय भगत,दिलीप कलाले व अन्य गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भारत मुक्ती मोर्चा,राष्ट्रीय मुस्लीम मोर्चा च्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. ढाणकी शहरात माता फातीमा शेख यांची ही जयंती अठरापगड जाती धर्मातील नागरिकांनी एकत्र येऊन ,प्रबोधन करून प्रथमच साजरी करण्यात आली.यामुळे या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# हनवतखेड तांड्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध राहील : आमदार मनोज कायंदे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** मौजे हनवतखेड तांडा येथे मातृतीर्थ सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायदे यांचा नागरी सत्कार सोहळ्यात जंगी स्वागत सत्कार करून व त्यांच्या हाताने कबड्डी सामनाचे उद्धाटन करण्यात आले. आमदार यांचा आगमन होताच फटाकेच्या आतिषबाजी नंतर तांड्या मधून मिरवणूक काढण्यात आली सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. अरविंद चव्हाण सर होते,सदर कार्यक्रमाला थोडा उशीर झालेला असून सुद्धा लोकांचा मात्र उत्साह काही कमी झालेला दिसून आला नाही सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वितेश चव्हाण यांनी केले,या बोलताना आमदारांनी सांगितले की या हनवतखेड वासियविषयांच्या वेगवेगळ्या समस्या सोडवण्यासाठी मला अर्ध्या रात्री बोलवा मी यायला तयार राहील कार्यक्रमाला परिसरातून विविध मान्यवर उपस्थित झाले होते त्यामध्ये प्रभाकर कायंदे दिनकर सोनवणे अनिल श्रीराम चव्हाण ,श्याम जाधव,डॉक्टर खरात, शुभम कायंदे ,अशोक वाघ,शंकर जायभाये,प्रवीण कायदे यास अनेक मान्यवर उपस्थित होते, सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हनवतखेड तांड्यातील तरुण युवकांनी पुढाकार घेतला होता .




## २ वर्ष प्रेम नंतर पळून लग्न, संशयानं घात केला, पत्नीला हालहाल करुन दिला भयानक मृत्यू

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत एक महिला २ वर्ष प्रियकरासोबत रिलेशनशिपमध्ये होते. मात्र त्यांच्या नात्याला कुटुंबियांची परवानगी नसल्याने दोघांनी पळून लग्न केले होतं. लग्नानंतर सर्व काही सुरळीत होतं. मात्र नवऱ्याने बायकोवर संशय घ्यायला सुरूवात केली होती.याच संशयातून त्याने आता बायकोची हत्या केली आहे. राखी उर्फ पूनम पाटील असे या मृत महिलेचे नाव आहे. या हत्येनंतर आरोपीने अपघाताचा बनाव रचत हत्याकांड लपवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांना या घटनेचा उलगडा करण्यात यश आलं आहे.

हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. तुळजाई नगरमध्ये हे दाम्पत्य राहत होतं. या घटनेत मृत महिलेच नाव राखी पाटील असे होते. खरं तर राखीचे आणि तिच्या नवरा सूरूवातीला दोन वर्ष नात्यात होते. त्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता.मात्र कुटुंबियांचा त्यांला विरोध होता. त्यामुळे दोघांनी पळून जाऊन लग्न करण्याचा निर्णय घेतला.लग्न झाल्यानंतर सर्व काही सुरळीत सूरू होतं. लग्नापासून त्यांना दोन मुलं देखील झाली होती. यानंतर अचानक मृत राखी पाटील दीड महिन्यापूर्वी घरातून निघून गेली होती. त्यानंतर काही दिवसांनीच ती घरात परतली. या प्रकारामुळे पती सुरजने पत्नी राखीच्या चारित्र्यावर संशय घेतला होता. तसेच घटनेच्या दिवशी सुरजने राखीला फोनवर कोणाशी तरी बोलतानाही देखील रंगेहाथ पकडले होते. त्यामुळे संशयातून रागाच्या भरात सुरजने राखीचे डोकं भितीवर आपटून तिची हत्या केली होती.

त्यानंतर बायकोची हत्येची घटना लपवण्यासाठी सूरजने हत्येचा बनाव रचण्याचा प्रयत्न केला होता. त्यानुसार सूरजने या हत्येला अपघाताचे स्वरूप देत रुग्णालयात नेले होते. तेथे त्याने बायको छतावरून पडल्याची माहिती डॉक्टरांना दिली होती. त्यानंतर या घटनेवर डॉक्टरांना संशय आल्याने त्यांनी हुडकेश्वर पोलिसांना घटनेची माहिती दिली होती.

# खाद्य पदार्थ विक्रेत्यांसाठी एक दिवशीय प्रशिक्षण; एफएसएसएआयचा उपक्रम

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण(एफएसएसएआय) पश्रि्चम क्षेत्रमार्फत 'संकल्प स्वच्छ आहार'उपक्रमांतर्गत रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा येथील सहकार विद्या मंदिर शाळेत रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी 'प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात २००० पेक्षा जास्त विक्रेते सहभागी होणार असून विषय तज्ज्ञाव्दारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाचे खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणचे सहायक संचालक ज्योती हरणे यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात 'संकल्प स्वच्छ आहार'उपक्रमांतर्गत खाद्य विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्रि्चम क्षेत्राचे सहायक संचालक अजय खैरनार, निलेश धंदाळे, शुभांगी निकम तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अन्न सुरक्षा प्रशिक्षण आणि प्रमाणीकरण कार्यक्रमात रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणारे २००० पेक्षा जास्त विक्रेते सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण आणि रसायने आणि खते मंत्री यांनी २०२३ च्या जागतिक अन्न सुरक्षा दिनी केलेल्या घोषणेला अनुसरून आहे. ज्यामध्ये २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस अन्न हाताळणी करणाऱ्या २.५ दशलक्ष जणांना प्रशिक्षण देण्याचे काम एफएसएसआयला देण्यात आले आहे.

एफएसएसआयचा फोस्टॅक कार्यक्रमातंर्गत अन्न हाताळणाऱ्यांना, ज्यामध्ये रस्त्यावरील विक्रेत्यांना अन्न सुरक्षा आणि स्वच्छता मानके राखण्यासाठी आवश्यक असलेले महत्त्वाचे ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करण्यासाठी तयार केला गेला आहे. या प्रशिक्षणात वैयक्तिक स्वच्छता, सुरक्षित अन्न हाताळणी आणि अन्नपदार्थ दूषित होण्यास प्रतिबंध यासारख्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश आहे. विक्रेत्यांना नियामक अनुपालन आणि अन्न सुरक्षा सुनिश्रि्चत करण्यासाठी करावयाचे उपाययोजनाची माहिती यावेळी दिली जाणार आहे.

रस्त्यावरील खाद्यपदार्थ हे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे एक जिवंत उदाहरण आहे, जे देशाच्या विविध पाककृती परंपरा, विशिष्ट चव आणि सामाजिक परिदृश्याचे दर्शन घडवते. त्याच्या वाढत्या लोकप्रियतेसह, ग्राहकांसाठी त्याची सुरक्षितता सुनिश्रि्चत करणे आणि त्याचबरोबर रस्त्यावरील या आवडत्या पदार्थांची निर्मिती करणाऱ्या विक्रेत्यांना पाठबळ देणे देखील महत्त्वाचे आहे.